महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: evaluationdept@maa.ac.in

---

# Question Bank

Standard:- 12th

Subject :- समाजशास्त्र

## March 2021

## सूचना

१. फक्त विद्यार्थ्यांना प्रश्नप्रकारांचा सराव करून देण्यासाठीच

२. सदर प्रश्नसंचातील प्रश्न बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेत येतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

# State Council of Educational Research & Training (SCERT)

## HSC

## समाजशास्त्र (विषय कोड–४५)

## प्रश्नपेढी

**(केवळ २०२०–२०२१ परीक्षेकरीता वगळलेला भाग सोडुन)**

### वस्तुनिष्ठ प्रश्न

प्र.१.अ) कंसातील योग्य पर्याय निवडुन विधाने पूर्ण करा व ती पुन्हा लिहा.

१) ज्यू धर्माचा पवित्र ग्रंथ .......... आहे.
(त्रिपिटक, तोरॉ, अवेस्ता)

२) चार पुरूषार्थ .......... धर्मात सांगितले आहे.
(हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन)

३) दिगंबर आणि श्वेतांबर .......... धर्मातील पंथ आहेत.
(जैन, बौद्ध, हिंदू)

४) मक्ताब ही .......... संस्था आहे.
(उच्च शिक्षण, तत्त्वज्ञानाचे शिक्षण, प्राथमिक शिक्षण)

५) कृतीचा मार्ग .......... होय.
(भक्तीमार्ग, कर्ममार्ग, योगामार्ग)

६) सेवासदनची स्थापना .......... यांनी केली.
(राधाकांत देव, महात्मा गांधी, बेहरामजी मलबारी)

७) पास्को कायदा .......... या वर्षी पास झाला.
(१९९७, २००७, २०१२)

८) भारतात ५५% पेक्षा आदिवासी .......... भागात राहतात.
(मध्य भारत, हिमालय, दक्षिण भारत)

९) भारतीय नागरिकांसाठी मतदानाला किमान वयोमर्यादा .......... वर्षे आहे.
(१४, १८, २१)

१०) भारताच्या पश्चिम विभागात .......... आदिवासी आढळतात.
(वारली, इरुला, गारो)

११) जीवात्मवाद या संज्ञेचे प्रणेते .......... होय.
(जेम्स फ्रेझर, एडवर्ड टेलर, मॅक्स म्युलर)

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

१२) २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येच्या ......... टक्के लोक ग्रामीण भागात राहतात.
(५१, ६९, ७५)

१३) समुदाय विकास कार्यक्रम ......... या वर्षी सुरू झाला.
(१९४८, १९५०, १९५२)

१४) दुय्यम स्वरूपाचे नातेसंबंध ......... समुदायात असतात.
(शहरी, ग्रामीण, आदिवासी)

१५) सर्वांसाठी घरे हा विकास कार्यक्रम ......... समुदायात राबविला गेला.
(आदिवासी, ग्रामीण, शहरी)

१६) बी.एस.गुहा या मानवशास्त्रज्ञांनी लोकसंख्येचे वंशावर आधारित ......... भागात वर्गीकरण केले आहे.
(४, ६, ८)

१७) 'सेव्हन सिस्टस' असा उल्लेख भारतातील ......... भागातील प्रदेशांचा केला जातो.
(पश्चिम, उत्तर पूर्व, उत्तर)

१८) 'गे' म्हणजे ......... मधील शारीरिक संबंध.
(स्त्री–स्त्री, स्त्री–पुरूष, पुरूष–पुरूष)

१९) २१ फेब्रुवारी हा ......... जाहीर केला.
(आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन, कामगार दिन, पृथ्वी दिन)

२०) १९७५–१९८५ हे आंतरराष्ट्रीय ......... दशक म्हणुन घोषित केले.
(कामगार, स्त्री, शेतकरी)

२१) पर्यावरण चळवळ म्हणुन ......... उदाहरण आहे.
(बेल बजाओ आंदोलन, चंपारंण्य सत्याग्रह, नर्मदा बचाव आंदोलन)

२२) भारतात जागतिकीकरणाची प्रक्रीया ......... हे अर्थमंत्री असताना सुरू झाली.
(डॉ. मनमोहनसिंह, निर्मला सीतारामन, प्रमोद महाजन)

२३) जानेवारी १९९९ मध्ये ......... व्यक्तींच्या स्वास्थाची काळजी घेण्यासाठी राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले.
(वृद्ध, गरीब, गरोदर महिला)

२४) अखील भारतीय महिला परिषदेची, स्थापना ......... वर्षी झाली.
(१९२६, १९४८, १९७५)

२५) चंपारण्य सत्याग्रह १९१७–१८ मध्ये ......... राज्यात झाला.
(मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश)

२६) १९८० मध्ये शेतकरी संघटनेची स्थापना ......... यांच्या नेतृत्वात झाली.
(शरद जोशी, चरणसिंह, स्वामी सहजानंद सरस्वती)

२७) घरगुती हिंसाचार ......... या ठिकाणाशी संबंधित आहे.
(शाळा, कुटुंब, कामाचे ठिकाण)

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

२८) 'जीवनज्याती व्यसनमुक्ती केंद्र' ही संस्था ......... समस्या सोडविणारी संस्था म्हणुन कार्यरत आहे.
(वृद्धांची, बेरोजगारी, अंमली पदार्थ व्यसन)

२९) सेल्फीज हे ......... प्रकारचे व्यसन आहे.
(भ्रमणध्वनी, अंमली पदार्थ, आंतरजाल)

३०) १९६१ मध्ये ......... परिषदेत भाषा त्रिसूत्री तयार करण्यात आली.
(मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, राज्यपाल)

प्र.१.ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून लिहा.

१) i) अहुर मज्द – ज्यु धर्म
ii) वर्धमान महावीर – जैन धर्म
iii) गुरु नानक – शिख धर्म
iv) येशू ख्रिस्त – ख्रिश्चन धर्म

२) i) ब्राह्मण – पुरोहित
ii) क्षत्रिय – व्यापारी
iii) वैश्य – शेतकरी
iv) शुद्र – हलक्या दर्जाची कामे

३) i) सती प्रतीबंधक कायदा – १८२९
ii) इंडीयन सिव्हील सर्व्हीस कायदा – १८६१
iii) विधवा पुर्नेविवाह कायदा – १८५६
iv) कास्ट डिसेबीलिटी रिमुव्हल कायदा – १९५०

४) i) ट्रान्सजेंडर पर्सन्स (प्रोटेक्शन ऑफ राइटस्) – २०१९
ii) हुंडा प्रतिबंधक कायदा – १९६१
iii) हिंदू कोड बील – १९५५
iv) प्रोटेक्शन ऑफ वुमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स कायदा – २००८

५) i) सय्यद वलीउल्लाह – वहाबी चळवळ
ii) इरोड व्ही. रामासामी – सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंट
iii) आत्माराम पांडुरंग तर्खडकर – ब्राम्हो समाज
iv) महात्मा ज्योतीबा फुले – सत्यशोधक समाज

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

६) i) खासी – हिमालयीन भाग
ii) जरावा – दक्षिण भारत
iii) गोंड – मध्य भारत
iv) वारली – पश्चिम भारत

७) i) मुंबई – झोपडपट्टी
ii) कोलकाता – बस्ती
iii) चेन्नई – चेरी
iv) जयपूर – गंदी बस्ती

८) i) मुंडा – निषाद भाषा परिवार आर्य भाषा
ii) ओंगन – परिवार हिमालयीन/किराता भाषा
iii) तिबेटो – परिवार द्रविडीयन भाषा परिवार
iv) तेलगु –

९) i) वर्गावर आधारीत संघर्ष – धर्मवाद
ii) प्रदेशावर आधारीत संघर्ष – प्रदेशवाद
iii) जातीवार आधारीत संघर्ष – जातीयवाद
iv) भाषेवर आधारीत संघर्ष – भाषावाद

१०) i) बाय–सेक्शुअल – जी व्यक्ती दोन्ही लिंगाशी आकर्षित असते.
ii) लेस्बियन – स्त्री व स्त्रीमधील शारिरीक संबंध.
iii) तृतीयपंथी – एखाद्या व्यक्तीची शारिरीक लैंगिकता व मानसिक लैंगिक भावना यांच्याशी सुसंगतता आढळुन न येणे.
iv) गे – पुरूष व स्त्रीमधील शारीरिक संबंध.

११) i) सेल्फायटिस (सेल्फी) – अमली पदार्थांचे व्यसन
ii) देशी दारू – मद्याचे व्यसन
iii) हिंसक चित्रपट – आंतरजाल व्यसन
iv) चरस – मादक पदार्थांचे व्यसन

१२) i) विद्यार्थी – ब्रह्मचर्याश्रम
ii) गृहस्थ – गृहस्थाश्रम
iii) एकांतवासी, निवृत्त होणे – वनाश्रम
iv) सर्वसंग परित्याग – संन्यासाश्रम

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

**प्र.१. क)** प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखुन लिहा.

१) | संत ज्ञानेश्वर, पवित्र वने, सुंदरलाल बहुगुणा, महर्षी कर्वे, झूम, नाना नानी पार्क |

१) आदिवासी समुदायातील शेडोबाचे वन (देवराई)
२) १३ व्या शतकातील भक्ती आंदोलनाचे प्रणेते.
३) प्रथम महिला विद्यापीठाची स्थापना
४) चिपको आंदोलनाचे नेतृत्त्व
५) वृद्धांकरीता सेवा

२) | कौटुंबीक हिंसा, जागतिकीकरण, दक्षिण भारत, लिंगभाव आधारीत विविधता, नारकोटीक ड्रग्ज, पश्चिम विभाग |

१) गांजा, चरस, कोकेन
२) तोडा, कोटा, बदागा
३) सुनेवरील अत्याचार
४) १९९१ मधील एलपीजी धोरण
५) स्त्री–पुरूष वर्ग

३) | चिपको आंदोलन, पंचायत राज, ऑल इंडीओ रेडीओ, आंतरजाल व्यसन, आर्थिक असमानता, भारतीय क्रांती दल |

१) शैक्षणिक फरक
२) मानसीक आरोग्यावर प्रभाव
३) मार्च १९७३ मधील चमोली जिल्ह्यातील झाडाला मिठी मारणे.
४) १९७४ मध्ये शेतकरी संघटनेची स्थापना
५) स्थानिक स्वराज्य संस्था

४) | बी.एस.गुहा, ॲनी बेझंट, मध्य भारत, नार्कोटिक्स ॲनानिमस्, मक्ताब, मदरसा |

१) थिऑसॉफीकल सोसायटी
२) ओरओन, हो, संथाल
३) सहा प्रमुख वंशावरील वर्गीकरण
४) मशिदीशी संलग्न असणारी प्राथमिक संस्था
५) व्यसनमुक्ती मदत संस्था

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan



५) | द्रवीडीयन भाषा परिवार, वर्धमान महावीर, पंडीत नेहरू, इंडो–आर्यन भाषा परिवार, डॅनीयल लर्नर, पुरुष प्रधान संस्कृती |
|---|

१) केवलीन (सर्वज्ञ) पदाची प्राप्ती
२) आधुनिकीकरणाची संकल्पना सांगणारे समाजशास्त्रज्ञ
३) काश्मिरी, आसामीज, बेंगाली
४) पंचशील तत्वज्ञान
५) समाजात पुरुषांचे वर्चस्व

**प्र.१. ड)** अधोरेखित शब्दांच्या जागी अचूक शब्द लिहुन विधाने पूर्ण करा.

१) ख्रिश्चन धर्माचा पवित्र ग्रंथ तोरॉ आहे.
२) अष्टांग मार्ग जैन धर्मात सांगितले आहे.
३) हिंदूचे अंतिम लक्ष म्हणजे धर्म.
४) अग्यारी हे ज्यु धर्माचे पूजास्थान आहे.
५) शिया व सुन्नी हे ज्यु धर्मातील पंथ आहे.
६) मक्ताब हे अल्लाह विषयीच्या परमोच्च तत्त्वांचे शिक्षण देणारे सुफी केंद्र आहे.
७) पुरोहित, शिक्षक, बुद्धिजीवी म्हणजे क्षत्रीय वर्णाचे होय.
८) ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग, राजमार्ग आणि कर्ममार्ग हे अर्थप्राप्ती चे चार मार्ग आहे.
९) हरीजन सेवक संघाची स्थापना राधाकांत देव यांनी केली.
१०) गारो, खासी या आदिवासी जमाती उत्तरपश्चिम हिमालय विभागात आढळतात.
११) आदिवासींमधे हत्तीला वनाचा रक्षक मानतात.
१२) आदिवासींमधील कंबाड नृत्य वनदेवतेला समर्पित आहे.
१३) व्यापार आणि व्यवसाय हा ग्रामीण समुदायातील मुख्य व्यवसाय आहे.
१४) मुंबईमध्ये दाटीवाटीने राहणाऱ्या लोकांच्या भागाला झुग्गी म्हणतात.
१५) ऑस्ट्रो–एशियाटिक भाषा परिवाराला किराता म्हणतात.
१६) संस्कृत भाषा द्रविडीयन भाषा परिवारात येते.
१७) प्रादेशिकवाद हा भाषेवर आधारीत आहे.
१८) संप्रदायवाद हा जातीवर आधारीत आहे.
१९) मान्सून या शब्दाचे मुळ मौसम या उर्दु शब्दात सापडते.
२०) एलपीजी धोरण श्रीमती इंदीरा गांधीच्या काळात सुरू झाले.
२१) १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणांमुळे शहरीकरणाची प्रक्रीया सुरू झाली.
२२) भाषेच्या आधारावर भारतीय राज्य पुर्नरचना १९४७ मध्ये करण्यात आली.
२३) आता आपण मायक्रोप्रोसेसच्या चौथ्या पिढीपर्यंत पोहचलो आहे.
२४) स्वामी दयानंद सरस्वतींनी १८७५ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली.
२५) २२ एप्रील हा पर्यावरण दिवस म्हणुन साजरा केला जातो.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

२६) नर्मदा बचाव आंदोलनाची सुरूवात वंदना शिवा यांनी केली.

२७) सेल्फायटिस ही आंतरजाल व्यसनाशी संबंधीत समस्या आहे.

२८) विधवा पुनर्विवाह कायदा १९५६ मध्ये लागु झाला.

२९) धरणांचा उल्लेख आधुनिक भारताची मंदीरे म्हणुन इंदीरा गांधींनी केला.

३०) 'बेल बजाओ आंदोलन' व्यसन समस्येशी संबंधीत आहे.

## लघुत्तरी प्रश्न

**प्र.२. टिपा लिहा.**

१) पूर्व वैदिक काळातील भारतीय स्त्रियांचे स्थान.

२) उत्तर वैदिक काळातील भारतीय स्त्रीयांचे स्थान.

३) वसाहतकालीन भारतातील शिक्षणपद्धती.

४) पुरूषार्थ

५) स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण.

६) मध्ययुगीन काळातील इस्लामीक शिक्षणपद्धती.

७) आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये.

८) ग्रामीण समुदायाची वैशिष्ट्ये.

९) शहरी समुदायाची वैशिष्ट्ये.

१०) आदिवासी समुदायातील समस्या.

११) ग्रामीण समुदायातील समस्या.

१२) शहरी समुदायातील समस्या.

१३) भारतीय समाजातीला धार्मिक विविधता.

१४) भारतीय समाजातील भाषिक विविधता.

१५) भारतीय समाजातील जातीय विविधता.

१६) लिंगभाव आधारित विविधता.

१७) भारतीय समाजात विविधतेत एकता.

१८) राष्ट्रीय एकतेपुढील अडथळे/आव्हाने.

१९) भाषा त्रिसूत्री

२०) जातीयवाद

२१) प्रादेशिकवाद

२२) संप्रदायवाद

२३) भाषावाद

२४) आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये.

२५) जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये.

२६) अंकीकृतकरणाची वैशिष्ट्ये.

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

२७) सामाजिक चळवळीची वैशिष्ट्ये.

२८) सामाजिक चळवळीची कारणे.

२९) महिला सशक्तीकरण

३०) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळ.

३१) चिपको आंदोलन

३२) नर्मदा बचाव आंदोलन

३३) वृद्धांच्या समस्या

३४) कौटुंबिक हिंसेची कारणे

३५) कौटुंबिक हिंसेचे परिणाम

३६) कौटुंबिक हिंसेवरील उपाययोजना

३७) व्यसनाधिनतेची कारणे.

३८) व्यसनाधिनतेवरील परिणाम

३९) भ्रमणध्वनी व्यसन

४०) आंतरजाल व्यसन.

**प्र.३. फरक स्पष्ट करा.**

१) पूर्व वैदिक काळ आणि उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची स्थिती.

२) ब्रह्मचर्याश्रम आणि गृहस्थाश्रम

३) बौद्ध धर्म आणि जैन धर्म

४) पारशी धर्म आणि ईस्लाम धर्म

५) आदिवासी समुदाय आणि ग्रामीण समुदाय

६) आदिवासी समुदाय आणि शहरी समुदाय

७) ग्रामीण समुदाय आणि शहरी समुदाय

८) जातीयवाद आणि संप्रदायवाद

९) भाषिकवाद आणि प्रादेशिकतावाद

१०) आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण

११) वैयक्तिक समस्या आणि सामाजिक समस्या

१२) भ्रमणध्वनी व्यसन आणि अंमली पदार्थ व्यसन

१३) चिपको आंदोलन आणि नर्मदा बचाव आंदोलन

१४) जाती विविधता आणि वर्ग विविधता

**प्र.४ था. खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१) आश्रमव्यवस्था

२) मदरसा

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

३) जात
४) वर्णाश्रम
५) भारताचे संविधान
६) आदिवासी कुळ
७) अनुसूचीत जमाती
८) लंगर
९) पंचशील तत्वज्ञान (पंडीत नेहरूंचे)
१०) पंचायत राज
११) कंबाड नृत्य
१२) शहरी गुन्हेगारी
१३) काळी जादू
१४) धार्मिक विविधता
१५) भाषिक विविधता
१६) प्रादेशीक विविधता
१७) जातीय विविधता
१८) वर्ग विविधता
१९) लिंग विविधता
२०) लैंगिकता
२१) लिंग अभिव्यक्ती
२२) भाषिक एकता
२३) जातीयवाद
२४) संप्रदायवाद
२५) प्रादेशिकवाद
२६) भाषावाद
२७) आर्थिक विषमता
२८) आधुनिकीकरण
२९) पर्यावरण चळवळ
३०) अमली पदार्थ व्यसन
३१) खाजगीकरण
३२) जागतिकीकरण
३३) अंकीकृतकरण
३४) संगणकीकरण
३५) सामाजीक चळवळ
३६) स्त्री चळवळ


Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi


३७) वृद्धत्व
३८) कौटुंबिक हिंसाचार
३९) आंतरजाल
४०) संघम कालखंड
४१) व्यसन
४२) स्वयंसेवी संस्था

**प्र.५.अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**


१.




२.




३.





Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi


Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.   Contact us: @SahajAdhyayan




४. **जात वर्णाश्रम**





५. **आश्रम व्यवस्था**



६.




७.




8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan



८. लिंग आधारित विविधता

१.

२.

३.

४.

९. **राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळे**

१. २. ३. ४.

**१०. डेव्हीड ॲबरले यांनी सांगितलेले सामाजिक चळवळीच प्रकार.**

१)

२)

३)

४)

**प्र. ५. ब) खालील विधाने चूक की बरोबर हे सांगुन सकारण स्पष्ट करा.**

१) धार्मिक शिकवणीचा मानवी वर्तनावर कोणताही प्रभाव नाही.

२) भारतीय शिक्षण पद्धतीत बदल घडुन आले आहेत.

३) कायदे सामाजीक बदल आणण्यास मदत करतात.

४) बौद्ध धर्म हा भारत व भारता बाहेरील अनेक भागांमध्ये पसरला गेला.

५) भारतात विविधतेत एकता आहे.

६) जागतिकीकरणाचा फक्त सकारात्मक प्रभाव आहे.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

७) महिलांच्या सशक्तीकरणावर शिक्षणाचा कोणताही प्रभाव पडत नाही.

८) भ्रमणध्वनी व्यसन फक्त तरूणांमध्ये आढळते.

९) समाज लिंगभाव तरलता हळूहळू स्वीकारत आहे.

१०) तंत्रज्ञान हे नेहमीच सामाजिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरते.

**प्र.६. अ)** खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारीत प्रश्नांचे उत्तरे लिहा.

**१) उतारा १० (पान नं. १११) —**

भारतीय चित्रपटाच्या प्रारंभ, प्रसार आणि जडणघडणीला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. एकेकाळी मूक चित्रपट काढले जात. अशा चित्रपटात पडद्यावरचे चित्र पाहून पेक्षक चित्रपटातून नेमका काय संदेश द्यायचा आहे त्याचा अर्थ लावत असत. नंतरचा काळ दृकश्राव्य चित्रपटांचा होय. त्यानंतर कृष्णधवल (ब्लॉक अँड व्हाईट) चित्रपट आणि नंतर रंगीत चित्रपट निर्माण होऊ लागले.

आर्थिकदृष्ट्या ज्यांना परवडते ते चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहतात, काहीजण घरीच दूरदर्शनवर चित्रपट पाहतात. चित्रपटांच्या कथांनी सर्वांचे मनोरंजन होते. चित्रपटांतून कल्पना, विचारधारा, शोकांतिका, एखादा विशिष्ट विषय किंवा मूल्ये प्रेक्षकांपर्यंत पोहोचवली जातात. आता सगळेजण आंतरजालावर (इंटरनेट) किंवा मोबाईल फोनवरही चित्रपट पाहू शकतात. चित्रपटांतून प्रेक्षकांना काही सुप्त अथवा थेट संदेश द्यावयाचे असतात. काहींच्या हे संदेश लक्षात येतात तर काहींच्या येत नाहीत.

'चित्रपटात भूमिका साकारण्याचे कसब असलेला/असलेली नट/नटी' यांखेरीज चित्रपटनिर्मिती आणि चित्रपटाचे विपणन यामध्ये अनेकांचा हातभार लागतो. यामध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक, पटकथा लेखक, रचनाकार, ध्वनी संयोजक, मेकअप करणारे कलाकार, उत्कृष्ट रचना उभी करण्यात प्रावीण्य असणारे, भूमिकांसाठी कलाकारांची निवड करणारे, संगीतकार इत्यादींचा समावेश असतो. असे अनेक पैलू अभ्यासण्यासाठी दृक समाजशास्त्र, जन संप्रेषण समाजशास्त्र आणि विपणन समाजशास्त्र असे विषय उपयुक्त ठरतात. माहितीचा स्त्रोत म्हणून आजही चित्रपटांची अनेकांगी भूमिका आहे. चित्रपट कथा आणि चित्रपटाचे प्रकार वाढतच आहेत. आता चित्रपट केवळ ठराविक साच्याच्या प्रेमकथा किंवा लिंगभावात्मक साचेबद्ध प्रतिमा घेऊन केल्या जाणाऱ्या कथांपुरते मर्यादित नाहीत. चित्रपटांमुळे एकीकडे मोठी उलथापालथ होऊ शकते किंवा नव्या विषयांकरता रुचीही निर्माण होऊ शकते. आता चित्रपटांच्या यादीमध्ये प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांची भर पडली आहे. त्यामुळे विविध विषयांवर चित्रपट निघत असल्याने अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

१) चित्रपट लोकांना कसे प्रभावीत करू शकतात ते समजावून सांगा?

२) प्रादेशीक आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या महत्वावर चर्चा करा?

३) चित्रपट निर्मितीमधील महत्त्वाच्या पैलूंविषयी सांगा?

४) दृश्य समाजशास्त्र चित्रपटांशी संबंधीत आहे असे आपल्याला वाटते काय?

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

**२) उतारा ६ (पान नं. १०९) :**

कोणत्याही समाजातील सदस्यांच्या मागण्यांचा परिणाम म्हणून सामाजिक चळवळी जन्म घेतात. समाजामध्ये होणाऱ्या आंतर्क्रियांच्या माध्यमातून अशा मागण्या आणि समाजहिताच्या बाबी समाजामध्ये सर्वांपर्यंत पोहोचतात. समाजहिताच्या या बाबींना संमती देणारा एक व्यक्तीसमूह एकमताने सामाजिक बदलासाठी प्रयत्न करतो. असे प्रयत्न सामाजिक चळवळीच्या जन्मासाठी कारणीभूत असतात. सामान्यपणे सामाजिक चळवळीची काही पायाभूत तत्त्वे आणि उद्दिष्ट्ये असतात. अनेक सामाजिक चळवळी या सामाजिक चळवळीचे प्रणेते किंवा त्यांच्या मुख्य प्रतिनिधींशी संबंधित असतात. भौगोलिक प्रदेशाचा विचार करता, एखाद्या सामाजिक चळवळीची व्यापकता वाढण्यासाठी काही वर्षे किंवा काही दशकांचाही कालावधी जाऊ शकतो.

सामाजिक सुधारणा चळवळ, व्यापार संघटना चळवळ, आदिवासी चळवळ, दलित चळवळ, स्त्री चळवळ, चिपको चळवळ, एलजीबीटी चळवळ, नागरी हक्क चळवळ, बुद्धिप्रामाण्यवादी चळवळ यांसारख्या अनेक चळवळींचा उदय आपल्या समाजात झाला. नंतर त्या चळवळींची व्यापकता वाढत गेली.

सामाजिक चळवळीला एकदा गती आली की ती समाजात सर्वांच्या परिचयाची होते. खरेतर अनेक चळवळींचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला. संशोधनासाठीही सामाजिक चळवळींचा आधार घेतला जातो. उदाहरणार्थ, श्रमिक, लिंगभाव, अल्पसंख्याक आणि पर्यावरणाचा अभ्यास करताना सामाजिक चळवळींचा अभ्यास करावा लागतो.

सामाजिक चळवळींमुळे आपण ज्या समाजाचा भाग आहोत तेथील सामाजिक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करणे भाग पडते. अशाच काही सामाजिक चळवळींचा परिणाम म्हणून काही कायदे पारित केले जातात. काळाच्या प्रत्येक टप्प्यात अथवा प्रत्येक पिढीच्या काही विशिष्ट सामाजिक समस्या असतात. अशाप्रकारे, प्रत्येक टप्प्यावर नव्या सामाजिक चळवळींचा उदय होऊ शकतो.

१) भारतीय समाजात कोणकोणत्या सामाजिक चळवळी निर्माण झाल्या?
२) सामाजिक चळवळींचा अभ्यास करण्याचे महत्त्व काय आहे?
३) सामाजिक चळवळी कशा निर्माण होतात?
४) आज प्रसारमाध्यमे सामाजिक चळवळींना कशा प्रकारे मदत करू शकतात?

**प्र.६. ब)** तुमचे मत नोंदवा.

१) समाजसुधारणेच्या चळवळी २१ व्या शतकातही सुरू आहे.
२) समाजातील कमकुवत वर्गाचे संरक्षण करणे महत्त्वाचे कां आहे?
३) जाती आजही लोकांच्या वर्तनावर प्रभाव पाडतात.
४) भारतीय समाजात धर्मनिरपेक्षता महत्त्वपूर्ण कां आहे?
५) भाषा राष्ट्रीय एकात्मतेमध्ये अडथळा असू शकते?
६) समाजात लैंगिक विविधता समजणे आवश्यक आहे?

Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

७) तंत्रज्ञानाच्या वापरामुळे केवळ सकारात्मक प्रभाव पडतो.
८) वृद्धाश्रमांमध्ये आज वाढ का होत आहे?
९) घरगुती हिंसा मुली आणि स्त्रियांपर्यंत मर्यादित नाही चर्चा करा.
१०) व्यसनग्रस्त समस्या असलेल्या एखाद्याला आपण कशी मदत करू शकाल?
११) आज आभासी शिक्षणाची गरज कां आहे?
१२) स्त्री शिक्षण काळाची गरज कां आहे?

## दीर्घोत्तरी प्रश्न

**प्र.७.** खालील प्रश्नांचे उत्तर सविस्तर लिहा. (१५०–२०० शब्दांपर्यंत)

१) स्वातंत्र्योत्तर भारतावर वसाहतकाळाचा कसा परिणाम झाला आहे? चर्चा करा.
२) धर्माचा समाजावर परिणाम होतो? योग्य उदाहरण देऊन चर्चा करा.
३) ग्रामीण समुदायाला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते? व त्या समस्या सोडविण्यासाठी असणाऱ्या उपाययोजनांवर चर्चा करा.
४) शहरी समुदायाच्या समस्यांचे वर्णन करा. आपल्या मते कोणत्या उपाययोजना करून या समस्या सोडविता येतील.
५) आदिवासींच्या समस्या सांगा? या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सांगा.
६) भारत हा बहुसांस्कृतिक देश आहे. उदाहरणासह चर्चा करा.
७) जागतिकीकरणाच्या सकारात्मक आणि नकारात्मक विचारांवर योग्य उदाहरणासह चर्चा करा.
८) भारतीय समाजात बदल घडुन येण्यासाठी अंकीकृतकरण व आधुनिकीकरणाची कशी मदत झाली ते उदाहरणासहीत स्पष्ट करा.
९) “जागतिक आंतरजाल हा माहितीचा आणि चुकीच्या माहितीचाही स्त्रोत आहे.” या विधानाची आंतरजालाच्या प्रभावासंबंधी पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.
   i) पालक    ii) मुले    iii) शाळा
१०) आज शाळा व महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणाचे महत्व आहे यावर चर्चा करा.
११) वृद्धांच्या समस्यांचे वर्णन करून त्यांचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सांगा.
१२) भ्रमणध्वनी व्यसनाचे योग्य उदाहरण देऊन दुष्परिणाम सांगा.
१३) आंतरजाल व्यसन एक सामाजिक समस्या आहे? ते कसे सोडवले जाऊ शकेल सांगा.
१४) मद्यपान व्यसनावर चर्चा करा?
   i) स्वत: मद्य घेणारी व्यक्ती
   ii) व्यसनाधीन व्यक्तींचे कुटुंब
   iii) समुदाय

✍✍✍✍✍✍

Contact us: @SahajAdhyayan
Free Practice Question Papers for 8th, 9th, 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.
8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi